## उपवनसंरक्षक, सातारा वन विभाग, सातारा यांचे कार्यालय

'वनभवन' , गोडोली रोपवाटीका, सातारा ४१५ ००१

☎ (०२१६२)२२००५८, फॅक्स : (०२१६२) २२००५९ ईमेल : forest.satara68@gmail.com


जा.क्र. ब/जमीन/ 2955 /19.20

सातारा. दिनांक :- 26 /11/2019

प्रति,

जनरल मॅनेजर (टेक)

प्रकल्प संचालक,भारतीय राजमार्ग प्राधिकरण,

स.नं.134/1 बायफभवन कॅम्पस

वारजे पुणे

विषय :- राष्ट्रीय महामार्ग क्र. 4 पुणे-सातारा खंबाटकी घाट नवीन बोगदा करण्यासंदर्भात वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत प्रस्ताव क्षेत्रा 7.26 हे.

संदर्भ :- १) मुख्य वनसंरक्षक (प्रा) कोल्हापूर यांचेकडिल क्र. कक्ष-6/नोसेल/सातारा/ खंबा.घाट/2328 दिनांक 19.8.2019

2) या कार्यालयाचे पत्र क्र. ब/जमीन 1929 दिनांक 4.9.2019

3) आपलेकडिल क्र. NHAI/PIU/PUNE/NEW/Khanbataki tunnel /Forest /2019/3659 Dated 22.10.2019

विषयांकित प्रस्तावास केंद्र शासनाचे दिनांक 26.11.2018 अन्वये दिलेल्या तत्वत: मान्यतेच्या पत्रात नमूद केलेल्या अटी शर्तीची पूर्तता करुन या कार्यालयाचे दिनांक 29.6.2019 अन्वये अहवाल मुख्य वनसंरक्षक (प्रा) कोल्हापूर यांचेकडे सादर करणेत आला होता. तथापि सदर अहवालाचे अनुषंगाने संदर्भिय पत्र क्र. 1 अन्वये त्रूटी काढणेत आल्या आहेत. त्याची पूर्तता संदर्भिय पत्र क्र. 3 अन्वये आपण या कार्यालयास सादर केल्या आहेत. तथापि सदर काढणेत आलेल्या त्रूटीमध्ये केंद्र शासनाचे पत्रातील अट क्र. 5,7 ते 25, व 31 ते 34 बाबत प्रकल्प यंत्रणेने हमीपत्रे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार आपण आपलेकडिल प्रमाणपत्र सादर न करता अहवाला सादर केला आहे. त्याप्रमाणे प्रमाणपत्रे ही मोघम सादर करणेत आली आहेत. सोबत हमीपत्रे सादर करणेबाबतच्या नमून्याची छायांकित प्रत माहितीसाठी जोडून पाठविली आहे. तरी सदर हमीपत्राचे नमून्याप्रमाणे आपलेकडिल मागणी केलेली 5,7 ते 25, व 31 ते 34 हमीपत्रे विहीत नमून्यात भरुन उलट टपाली सादर करावीत.

तसेच अट क्र. 24 प्रमाणे प्रकल्प यंत्रणा रेस्कयू सेंटरचा खर्च आदा करेल याबाबत हमी सादर करणेबाबत कळविले होते. तथापि सदर कामात वाव नसलेचे कळवले आहे. परंतु केंद्र शासनाचे अटी शर्तीप्रमाणे त्याचे बांधकाम करणे आवश्यक आहे. तरी त्याबाबतचे हमीपत्र सादर करावे. तसेच सदर कामासाठी येणा-या अंदाजित रक्कम रु. 50,00,000/- कॅम्पामध्ये भरणा करुन बँकेचे चलन या कार्यालयास सादर करावे. याबाबत अंदाजपत्रकाप्रमाणे जादा रक्कम लागलेस त्याप्रमाणे प्रकल्प यंत्रणा भरणेबाबत तयार असलेचे हमीपत्र सादर करावे.

(डॉ. भारत सिंह हाडा)

उपवनसंरक्षक

सातारा वन विभाग, सातारा

सोबत - वरीलप्रमाणे